# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक

गडचिरोली दि. ०२/०१/२०१७

भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने महिलांच्या सुरक्षा संबंधात विविध उपययोजना करण्यात आल्या असून महिलाचे अत्याचारास व छेडछाळीस प्रतीबंध घालण्याकरीता  गडचिरोली जिल्हयात पोलीस अधिक्षक, डॉ. अभिनव देशमुख यांनी प्रत्येक पोलीस ठाणे/उप-पोलीस ठाणे अंमर्गत "दामीणी" पथक तयार करण्यात आले असून सदर दामीणी पथक पोलीस ठाणे परीसरात रेल्वे स्टेशन, बस स्थानक धार्मीक स्थळे, चित्रपटगृह, शाळा, कॉलेज, शिकवणी क्लॉसेस व इतर गर्दीचे ठिकाणी नियमीत  पेट्रोलींग करीत असून महिलांना सुलभरित्या सहकार्य मिळावे **"टोल फ्री क्र. १०९१"** सुरु केले आहे.  ज्यांच्याकडे स्मार्ट फोन आहे त्यांनी **"प्रतिसाद ॲप"** डाऊनलोड करावा व त्यावर आपली तक्रार नोंदवावी, प्रतिसाद ॲप चे फलक व पोस्टर्स लावण्यात आले आहे. छेडछाडीला आळा घालण्यासाठी  पोलीसांचा साध्या  कपडयांचा बंदोबस्त लावण्यात येतो. सीसीटीव्ही कॅमेर लावण्यात आले आहे. महिलांच्या  छेडछाडीला व महिला अत्याचारा संबंधात गुन्हयांला आळा बसण्याकरीता  वरील  सुविधा उपलब्ध केली असून वरील सुविधांच्या  महिलांनी लाभ घ्यावा.